# थेट सामना

● संपादक : नामदेव उत्तम शिंदे www.tsamana.com

● लातूर ● साप्ताहिक ● शुक्रवार, दि. ९ ऑक्टोबर २०२६ ● वर्ष २ रे ● अंक ५० ● E-mail :- namdevshinde680@gmail.com ● RNI. No. MHMAR/25/A2752 ● पाने ४ ● किंमत १ रुपये ●


## एमपीएससी प्रकरणात हायकोर्टाचा लिखित आदेश

**पुणे :** विविध मागण्यांसाठी पुण्यात एमपीएससी परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांचं आंदोलन सुरू आहे. आता या प्रकरणात हायकोर्टाकडून लिखित आदेश जारी करण्यात आला आहे. मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाकडून हे आदेश जारी करण्यात आले आहेत. राज्य सरकारने मागण्या मान्य केल्या आहेत. सरकारची कृती पाहता त्यावर सकारात्मकपणे कारवाई झाली आहे. विद्यार्थ्यांनी आता आपल्या कॅम्पस क्लासेसकडे जावे आणि त्यांची स्वप्न, आकांक्षा पूर्ण कराव्यात, असं हायकोर्टाने म्हलटं आहे.

मुख्य न्यायमूर्ती महेशचंद्र त्रिपाठी आणि न्यायमूर्ती अद्वैत सेठना यांच्या खंडपीठाकडून हे आदेश जारी करण्यात आले आहेत. राज्य सरकारने मागण्या मान्य केल्या आहेत. सरकारची कृती पाहता त्यावर सकारात्मकपणे कारवाई झाली आहे. विद्यार्थ्यांनी आता आपल्या कॅम्पस क्लासेसकडे जावे आणि त्यांची स्वप्न, आकांक्षा पूर्ण कराव्यात. यादृष्टीने प्रशासनाने आवश्यक ती सर्व पाऊले उचलावीत. पोलिसांनी वाहतूक खोळंबा होणार नाही, अशा ठिकाणी आंदोलना परवानगी द्यावी, आंदोलकांना आता रस्त्यावर बसता येणार नाही, असं हायकोर्टाने म्हटलं आहे.

# दुष्काळग्रस्त राज्याची केंद्रीय पथकांकडून पाहणी



## ११ सदस्यांचे पथक महाराष्ट्रामध्ये अखेर दाखल

**मुंबई : खरीप हंगाम २०२६ मधील दुष्काळी परिस्थिती आणि पिकांच्या नुकसानीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी केंद्र सरकारचे आंतरमंत्रालयीन पथक महाराष्ट्राच्या दौऱ्यावर आले आहे. ८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान होणाऱ्या या दौऱ्यात राज्यातील दुष्काळी परिस्थितीचा आढावा घेण्यात येणार असून, पाऊस, पीक नुकसान, पिण्याच्या पाण्याची उपलब्धता आणि जनावरांच्या चाऱ्याच्या स्थितीची प्रत्यक्ष पाहणी केली जाणार आहे. केंद्राच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयाचे संयुक्त सचिव मुक्तानंद अग्रवाल हे या पथकाचे प्रमुख आहेत. केंद्र शासनाच्या कृषी, जलसंपदा, ग्रामीण विकास, पाणीपुरवठा, अन्न व सार्वजनिक वितरण, पशुसंवर्धन, अर्थ विभाग, नीती आयोग आणि अन्य संबंधित विभागांतील प्रशासकीय आणि तांत्रिक अधिकाऱ्यांचा पथकात समावेश आहे.**

केंद्रीय पथकाच्या मुंबईतील आगमनानंतर सह्याद्री अतिथीगृह येथे आज मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत बैठक झाली. मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी यावेळी पावसाच्या कमतरतेमुळे महाराष्ट्रातील काही भागांत निर्माण झालेली पाणीटंचाई, टँकर्सची संभाव्य गरज, शेतीवर अवलंबून असलेले शेतमजूर व जमीनधारकांचे प्रश्न, मजुरांची स्थलांतराची शक्यता आणि शेतकरी आत्महत्या या बाबींकडे केंद्रीय पथकाचे लक्ष वेधले.

राज्याच्या मदत व पुनर्वसन विभागाच्या वतीने अपर मुख्य सचिव विनिता वेद-सिंगल यांनी राज्यातील पावसाची स्थिती, अल निनोमुळे हवामान आणि पावसावर झालेले परिणाम तसेच शेतीपिकांच्या नुकसानीची सविस्तर आणि तांत्रिक माहिती दिली. पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेबाबतही सविस्तर आढावा सादर करण्यात आला. कृषी विभागाच्या वतीने सचिव परिमल सिंह आणि आयुक्त सुरज मांढरे यांनी राज्यातील पिकांच्या नुकसानीची आणि जिल्हानिहाय परिस्थितीची वस्तुनिष्ठ माहिती केंद्रीय पथकासमोर मांडली. पशुसंवर्धन विभागाच्या वतीने आयुक्त डॉ.किरण पाटील यांनी जनावरांच्या चाऱ्याची सद्यस्थिती तसेच आगामी सात महिन्यांसाठीच्या संभाव्य परिस्थितीची माहिती दिली.

राज्यातील पावसाचे प्रमाण कमी झाल्याने पिण्याच्या पाण्याच्या उपलब्धतेवर परिणाम झाला आहे. सध्या टँकरद्वारे सुरू असलेला पाणीपुरवठा, मागील तीन वर्षांच्या तुलनेतील पाण्याची स्थिती आणि टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू करण्यासाठी प्रस्तावित असलेल्या गावांची माहिती पाणीपुरवठा विभागाचे अपर मुख्य सचिव पराग जैन तसेच भूजल सर्वेक्षण व विकास आयुक्त रवींद्र खेबुडकर यांनी सादर केली. जलसंपदा विभागाचे प्रधान सचिव एकनाथ डवले, जलसंधारण विभागाचे सचिव जितेंद्र पापळकर, रोजगार हमी योजनेचे सचिव अप्पासाहेब धुळाज यांच्यासह ऊर्जा विभागाच्या वतीने सद्यस्थितीचा आढावा सादर करून आगामी सात महिन्यातील संभाव्य परिस्थितीची माहिती दिली. यावेळी लघुपाटबंधारे तलाव (एमआय टँक), गावांमधील पाण्याचे स्रोत आणि त्यांची सद्यस्थिती याबाबतही केंद्रीय पथकाला माहिती देण्यात आली.

**८ ते ११ ऑक्टोबरदरम्यान केंद्रीय पथकाचा महाराष्ट्र दौरा**

राज्य शासनाने सादर केलेली आकडेवारी, उपलब्ध पुरावे आणि विविध विभागांकडून मिळालेल्या माहितीची केंद्रीय पथकाने दखल घेतली. या माहितीच्या आधारे दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी कोणत्या जिल्ह्यांना आणि ठिकाणांना भेटी द्यायच्या, याबाबत नियोजन करण्यात आले. केंद्रीय पथकातील अधिकारी राज्यातील विविध भागांत जाऊन दुष्काळी परिस्थिती, पिकांचे नुकसान आणि पाणीटंचाईची प्रत्यक्ष पाहणी करणार आहेत. यासाठी विविध पथके तयार करुन जास्तीत जास्त क्षेत्राचा आढावा घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. या पाहणीदरम्यान स्थानिक अधिकारी, तज्ज्ञ आणि राज्य शासनाचे संबंधित अधिकारीही उपस्थित राहणार आहेत.

प्रत्यक्ष पाहणी पूर्ण केल्यानंतर केंद्रीय पथक मुंबईत परतणार असून ११ ऑक्टोबर रोजी दुष्काळी परिस्थितीबाबत पुढील सविस्तर चर्चा करणार आहे. या दौऱ्याच्या माध्यमातून राज्यातील दुष्काळाची वस्तुस्थिती, शेतीपिकांचे नुकसान, पाणीटंचाई आणि आवश्यक उपाययोजनांची माहिती केंद्र सरकारसमोर मांडली जाणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या बैठकीस महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, ग्रामविकास विभागाचे सचिव डॉ.चंद्रकांत पुलकुंडवार, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज यांच्यासह राज्यातील संबंधित विभागांचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

## ‘आदर्श’स्कूलचा संस्थापक बशीर शेखला ठोकल्या बेड्या

**लातूर :** अल्पवयीन विद्यार्थिनींच्या लैंगिक छळाच्या आरोपाप्रकरणी गुन्हा दाखल झाल्यानंतर फरार झालेल्या आदर्श इंटरनॅशनल स्कूलच्या संस्थापकाला लातूर पोलिसांनी अखेर अटक केली. बशीर उस्मान शेख (वय ५४, रा. प्रकाश नगर, लातूर) असे अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. एमआयडीसी पोलीस ठाण्यात उठ छे. ६८७/२०२६ अन्वये भारतीय न्याय संहिता (इछड) कलम ७४, ७६, ३५१(२) तसेच पॉक्सो कायद्याच्या कलम ८ व १२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



गुन्हा दाखल होण्याच्या एक दिवस आधीच आरोपी फरार झाल्याचे तपासात निष्पन्न झाले होते. गंभीर प्रकरण असल्याने आरोपीचा शोध घेऊन अटक करण्यासाठी लातूर पोलिसांकडून विशेष शोधमोहीम राबविण्यात आली.

पोलीस अधीक्षक अमोल तांबे, अपर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण आणि उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर समीरसिंह साळवे यांच्या मार्गदर्शनाखाली एमआयडीसी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक समाधान चावरे यांच्या नेतृत्वाखाली तीन विशेष पथके तयार करण्यात आली.

या पथकांमध्ये तीन अधिकारी आणि १२ पोलीस अंमलदारांचा समावेश होता. आरोपीच्या शोधासाठी उदगीर, उमरगा, पुणे, पनवेल आणि पालघर या ठिकाणी तपास व शोधमोहीम राबविण्यात आली. गोपनीय माहिती तसेच तांत्रिक विश्र्लेषणाच्या आधारे आरोपीचा माग काढण्याचे प्रयत्न सुरू होते. पोलिसांच्या प्रयत्नांना अखेर यश आले. आरोपी काल रात्री उशिरा पोलिसांच्या हाती लागला. त्याला ताब्यात घेऊन कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर अटक करण्यात आली आहे.

अल्पवयीन मुली, विद्यार्थी आणि महिलांशी संबंधित गुन्ह्यांबाबत लातूर पोलिसांकडून गांभीर्याने कारवाई केली जात असल्याचे पोलिसांनी सांगितले. अशा गुन्ह्यांची माहिती मिळताच तातडीने कायदेशीर कारवाई करण्याच्या सूचना पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांच्या प्रभारी अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी आरोपीच्या अटकेबाबत सातत्याने आढावा घेत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना दिल्या. त्यानुसार विशेष पथकांनी विविध ठिकाणी शोधमोहीम राबवून फरार आरोपीला अटक केली. या गुन्ह्याचा पुढील तपास एमआयडीसी पोलीस ठाण्याचे अधिकारी करीत आहेत.

## पाण्याचा अपव्यय रोखण्यासाठी उपाययोजना करा

### पाणी, चारा टंचाईचा जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी घेतला आढावा

**लातूर :** जिल्ह्यातील पाणी टंचाईची परिस्थिती लक्षात घेता पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी आवश्यक उपाययोजना तातडीने हाती घ्याव्यात. तसेच मांजरा धरणातून पाणीपुरवठा होणाऱ्या पाईपलाईनवरून होणारी पाणीचोरी, जिल्ह्यातील विविध प्रकल्पांमधील अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी कठोर कारवाई करून सिंचन प्रकल्पांवर रात्रीची गस्त वाढवावी, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी दिल्या. पाणी व चारा टंचाईच्या अनुषंगाने बुधवारी आयोजित आढावा बैठकीत ते बोलत होते.



जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहूल कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, संदीप कुलकर्णी, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, मंजुषा लटपटे, अविनाश कोरडे, सुशांत शिंदे, शरद झाडके, उपायुक्त डॉ. पंजाबराव खानसोळे, ग्रामीण पाणी पुरवठा यंत्रणेचे कार्यकारी अभियंता बाळासाहेब शेलार, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव यांच्यासह विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी यावेळी उपस्थित होते.

नगरपालिका व नगरपंचायतींनी त्यांच्या मालकीच्या सर्व विंधन विहिरी तसेच पाणी पुरवठा योजनांच्या विहिरींची दुरुस्ती करून घ्यावी. तसेच जिल्ह्यातील नागरिकांनी स्वतःच्या मालकीच्या विंधन विहिरींतून पाणी उपसा कमी करून पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन करण्याच्या सूचना जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी दिल्या. पिण्याच्या पाण्याचे नियोजन करताना मानवी वापरासोबतच पशुधनासाठी लागणाऱ्या पाण्याचाही आवश्यकतेनुसार समावेश करावा.

तहसीलदार, गट विकास अधिकारी आणि मुख्याधिकारी यांनी सद्यस्थितीत उपलब्ध असलेले जलसाठे आणि पर्यायी जलस्त्रोत यांचा विचार करून पाणी पुरवठ्याचे नियोजन करावे. उपविभागीय अधिकारी व तहसीलदार यांनी सर्व संबंधित विभागांच्या समन्वयाने गावनिहाय आराखडा तयार करावा. तसेच ग्रामसेवक आणि विस्तार अधिकाऱ्यांवर जबाबदारी सोपवून प्रत्येक गावातील पाणी पुरवठ्याचा सविस्तर आढावा घ्यावा. उपलब्ध जलस्रोत किती दिवस पुरतील आणि त्यानंतर कोणते पर्यायी जलस्रोत वापरता येतील, याची अचूक माहिती संकलित करण्याच्या सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

पशुसंवर्धन विभागाने तालुक्यातील पशुधनाची गावनिहाय संख्या संबंधित तहसीलदारांकडे तातडीने उपलब्ध करून द्यावी. पशुधनासाठी चाऱ्याची कमतरता भासू नये म्हणून पर्यायी चाऱ्याची माहिती गोळा करावी. ‘व्हीबी-जी राम जी’ योजनेतून चारा लागवडीचे नियोजन करण्यात यावे. ज्या शेतकऱ्यांकडे पाण्याची उपलब्धता आहे, त्यांना एक ते दीड महिन्यात तयार होणाऱ्या चाऱ्याची लागवड करण्यासाठी प्रोत्साहित करावे. पशुसंवर्धन विभागाने त्यांना बियाणे उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही सुरु करावी, असेही जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी नमूद केले.

दुष्काळी परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन स्थानिक स्तरावर रोजगार उपलब्ध होण्यासाठी व्हीबी-जी राम जी योजनेअंतर्गत कामांचे योग्य नियोजन करावे. यामध्ये जलसंधारण, तलावांतील गाळ उपसा आणि चारा लागवडीची कामे मंजूर करून सेल्फवर ठेवावीत. परिस्थितीनुसार ही कामे तातडीने सुरू करण्यासाठी आवश्यक त्या सर्व प्रशासकीय बाबींची पूर्तता आधीच करून ठेवावी, अशा सूचनाही जिल्हाधिकाऱ्यांनी बैठकीत दिले.

## डोणजे गावात भावपूर्ण वातावरणात ’नटसम्राटा’ला शेवटचा निरोप





# ‘नटसम्राट’ नाना पाटेकर ‘अनंतात’ विलीन

**पुणे :** अभिनय क्षेत्रातील लाडकं व्यक्तिमत्व आणि खऱ्याखुऱ्या आयुष्यातील ’नटसम्राट’ अशी ख्याती असलेले ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर अनंतात विलीन झाले. पुणे जिल्ह्यातील डोणजे येथील त्यांच्या निवासस्थानी शासकीय इतमामात त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. आपल्या लाडक्या अभिनेत्याला डोळे भरून शेवटचा निरोप देण्यासाठी आणि अंतिम दर्शन घेण्यासाठी डोणजे गावात हजारोंचा जनसमुदाय लोटला होता. अश्रू ढाळत आणि जड अंतःकरणाने संपूर्ण महाराष्ट्राने या महान कलावंताला अखेरचा निरोप दिला.

नाना पाटेकर यांचा मुलगा मल्हार याने त्यांना मुखाग्नी दिली. त्यावेळी ‘नाना पाटेकर अमर रहे’ अशा घोषणा उपस्थित असलेल्यांनी दिल्या. नाना पाटेकरांच्या अकाली एक्झिटनं मनोरंजनसृष्टीला मोठा धक्का बसला आहे. गोव्यातील निवासस्थानी नाना पाटेकरांना हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्यांना मणिपाल रुग्णालयात दाखल करण्यात आलं. मात्र, उपचारादरम्यान त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या या अकाली एक्झिटमुळे मराठी रंगभूमीसह संपूर्ण भारतीय चित्रपटसृष्टीला मोठा धक्का बसला आहे.



ज्येष्ठ अभिनेते आणि माझे निकटचे मित्र नाना पाटेकर यांची अशी अकाली आणि अचानक ‘एक्झिट’ मनाला मोठा धक्का देणारी आहे. मन प्रचंड दुःखी आहे. नाना जितके पडद्यावर मोठे, तितकेच मनाने सुद्धा मोठे होते. मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीला त्यांनी एक कालखंड दिला. त्यातून प्रामुख्याने एक राष्ट्रभक्त अशीच त्यांची प्रतिमा प्रेक्षकांना भावली. ’क्रांतिवीर’ ते ‘नटसम्राट’ या त्यांच्या प्रवासात जो दमदार आणि कसदार अभिनयाचा पट त्यांनी उभा केला, त्याला तोड नाही. त्यामुळे अभिनेता म्हणून त्यांचे जाणे ही मोठी हानी आहे. परखडपणा, बेधडकपणा हे स्वभावगुण त्यांचे व्यक्तिमत्त्व खुलवणारे ठरले. पण मी मुख्यमंत्री झाल्यापासून त्यांच्यातील हळवा माणूस कायम पाहत आलो आहे. आम्ही जलयुक्त शिवार अभियान हाती घेतले. मकरंद अनासपुरे आणि त्यांनी सोबत येत ‘नाम फाऊंडेशन’ची स्थापना केली. यंदाही आपण दुष्काळाचा सामना करीत असताना नाना कधीच मागे राहिले नसते, पण ते अचानक सोडून निघून गेले. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या, चाहत्यांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत.

**– देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

निधनाचे वृत्त समजताच गोव्याहून नाना पाटेकरांचे पार्थिव विशेष एअर ॲम्ब्युलन्सद्वारे पुणे विमानतळावर आणण्यात आले. तिथून रस्तेमार्गे पार्थिव त्यांच्या डोणजे येथील निवासस्थानी अंतिम दर्शनासाठी ठेवण्यात आले. नानांच्या निधनाची बातमी पसरताच अवघा महाराष्ट्र हळहळला आणि चाहत्यांनी डोणजे गावाकडे धाव घेतली.

नाना पाटेकरांना अंतिम निरोप देण्यासाठी आणि श्रद्धांजली अर्पण करण्यासाठी राजकीय, सामाजिक आणि चित्रपट क्षेत्रातील दिग्गज मान्यवर डोणजे गावात उपस्थित होते. राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, मंत्री चंद्रकांत पाटील, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ, रामदास आठवले, सुनील तटकरे, माधुरी मिसाळ, आमदार गोपीचंद पडळकर, अर्जुन खोतकर, रुपाली चाकणकर, सदाभाऊ खोत आणि उदय सामंत यांनी उपस्थित राहून पुष्पचक्र अर्पण केले.

अभिनेते मकरंद अनासपुरे, नागराज मंजुळे, नीना कुलकर्णी, प्रवीण तरडे, सुरेश वाडकर, पुरुषोत्तम बेर्डे, सुशांत शेलार, लेखक अरविंद जगताप यांच्यासह ‘नाम’ फाउंडेशनचे प्रतिनिधी, नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संपादकीय...

### आंदोलनांचा सांगावा

'नीट' पेपरफुटीनंतर दिल्लीतील 'जंतर मंतर'वर झालेल्या जेन झी आंदोलनाने देशातील जनतेच्या मनातील संताप उघडपणे बाहेर पडायला सुरुवात झाली असताना 'एसआयआर'चे कोलितच विरोधकांना मिळाले आहे. केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात सध्या देशभर वातावरण तापले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली केंद्रीय निवडणूक आयोगाने देशभरात 'विशेष सखोल पुनर्निरीक्षण' अर्थात 'एसआयआर'च्या अंतर्गत मतदार याद्या सुधारण्याचे काम सुरू केले आहे. त्यात देशभरातून तब्बल १३ कोटी लोकांची नावे वगळण्यात आली आहेत; शिवाय यादीत नाव समाविष्ट करण्यासाठी जो सहा क्रमांकाचा अर्ज भरावा लागतो, त्यात विचित्र व जाचक अटी त्यांनी घातल्या. त्यातच ज्ञानेशकुमार हे मुख्य आयुक्त असले, तरी इतर दोन आयुक्तांच्या सहमतीनेच आयोगातील निर्णय त्यांनी घ्यावेत, असा कायदा असताना त्यालाही त्यांनी हरताळ फासल्याचे पुरावेच प्रसार माध्यमातून समोर आले. इतके सगळे झाल्यावर पंतप्रधान नरेंद्र मोदी, भारतीय जनता पक्ष व केंद्रीय निवडणूक आयोग यांना विरोधक लक्ष्य करणे अगदीच स्वाभाविकच आहे. मुंबईत शुक्रवारचे कॉक्रोच जनता पार्टीचे (सीजेपी) आंदोलन व रविवारी शिवसेना (उबाठा) व मनसे यांच्या मोर्चाला मिळालेला प्रतिसाद पाहता, जनतेच्या मनात याविषयी खदखद आहे, हे नाकारता येणार नाही. मात्र, मुंबईतील ही दोन्ही आंदोलने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारने ज्या पद्धतीने हाताळली, त्यावरून केंद्रातील भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाने खरे तर धडा घ्यायला हवा.

जंतर मंतरवरील आंदोलकांविरोधात केला गेलेला पोलिसी बळाचा वापर राजकीयदृष्ट्या केंद्र सरकारला खूपच अडचणीचा ठरला होता. यावरून धडा घेऊन फडणवीस यांनी या दोन्ही आंदोलनांत कुठेही पोलिसी बळाचा वापर केला नाही. अगदी शिवाजी पार्कातल्या कॉक्रोच जनता पार्टीच्या आंदोलन स्थळावर उपस्थित पोलिसांकडे लाठ्या अथवा शिरस्त्राणेही नव्हती. उद्धव व राज या ठाकरे बंधूंच्या मोर्चाला अपेक्षेप्रमाणेच मोठा प्रतिसाद लाभला. महाराष्ट्रातून दोन कोटी व देशातून १३ कोटी मतदार वगळले जाणे, मुख्य निवडणूक आयुक्तांची निवड प्रक्रिया, संपूर्ण निवडणूक प्रक्रियाच ताब्यात घेऊन जनतेला मूर्ख बनवणे आदी टीका दोन्ही नेत्यांनी केली. 'एसआयआर'च्या निमित्ताने काही गंभीर प्रश्न जनतेच्या मनात घर करू लागले आहेत, हे नाकारता येणार नाही. 'एसआयआर'च्या निमित्ताने निवडणूक आयोग 'एनआरसी' म्हणजे 'नॅशनल रजिस्टर ऑफ सिटिझन'ची मोहीम राबवत असल्यासारखे त्याचे वर्तन आहे. या देशातील नागरिकत्व ठरवण्याचा अधिकार निवडणूक आयोगाकडे नव्हे, गृहखात्याकडे आहे. त्यामुळे नावे वगळणे, त्यानंतर पुन्हा नवा मतदार म्हणून सहा क्रमांकाचा अर्ज भरायला लावणे, त्यात आई वा वडिलांच्या जन्माचा दाखला अनिवार्य करणे या मागे नक्की हेतू काय, याचे समाधानकारक स्पष्टीकरण आयोग देऊ शकलेला नाही. गोव्यातील ९७ मतदारांनी सगळ्या कागदपत्रांची काटेकोर पूर्तता केल्यानंतरही त्यांची नावे कशी वगळली गेली, असा प्रश्न उपस्थित केला गेला. त्या प्रक्रियेत केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदार यादी संगणकीकृत करण्यासाठी जी प्रणाली तयार केली आहे, त्यातील दोष समोर आल्याने लोकांच्या मनातील संशय बळावणारच.

मुळात मुख्य निवडणूक आयुक्त निवडीच्या प्रक्रियेत, पंतप्रधान, विरोधी पक्षनेता व सरन्यायाधीश अशी अंतरिम तरतूद सर्वोच्च न्यायालयाने केली होती. त्यानंतर सरकारने नवा कायदा केला आणि त्यामध्ये सरन्यायाधीशांऐवजी गृहमंत्र्याना स्थान दिले त्यामुळे विरोधकांच्या मनात संशय निर्माण झाला आहे. न्यायाच्या प्रक्रियेत केवळ न्याय होणे महत्त्वाचे नसून, तो झाल्याचे दिसणेही महत्त्वाचे असते. लोकशाही प्रक्रिया राबवताना जे प्रशासकीय निर्णय घ्यावे लागतात त्यातही हेच सूत्र लागू पडते. यादीत सुधारणा होणे गरजेचे आहेच; कारण मतदार यादीत नाव समाविष्ट करणे जितके सोपे आहे, तितके त्यातून नाव वगळणे कठीण आहे. त्यामुळे दुबार मतदार, मृत व्यक्ती यांची नावे वगळायलाच हवीत. मात्र, प्रक्रियेबाबत जनतेच्या मनात संशय निर्माण होणार नाही हे पाहणे आयुक्तांचे व एका अर्थी सरकारचे काम आहे. देशभरातून ज्ञानेशकुमार यांच्या विरोधात उठलेल्या आवाजाची दखल संबंधितांनी त्वरेने घेणे हेच सगळ्यांसाठी हितकारक ठरेल, हा या आंदोलनांचा सांगावा आहे.

# अपील आले तर वेळकाढूपणा नको : आयुक्त

## आयुक्त डॉ. किरण जाधव यांच्या सर्व अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना!

**लातूर :** नागरिकांना पारदर्शक, गतिमान आणि कालबद्ध शासकीय सेवा मिळाव्यात, यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना राज्यसेवा हक्क आयुक्त डॉ. किरण जाधव यांनी दिल्या. या अधिनियमांतर्गत सेवा वेळेत न मिळाल्याने प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे दाखल होणाऱ्या अपिलांचा सुनावणी घेऊन विहित कालावधीत निपटारा करावा, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हाधिकारी कार्यालयात महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत अधिसूचित सेवांचा आढावा घेण्यासाठी आयोजित बैठकीत डॉ. जाधव बोलत होते.




यावेळी जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहुल कुलकर्णी, अपर जिल्हाधिकारी शिल्पा करमकर, उपजिल्हाधिकारी गणेश पवार, सायली ठाकूर, जिल्हा परिषदेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब वाघ यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत प्राप्त होणारे अर्ज प्रलंबित राहू नयेत, यासाठी विभागप्रमुखांनी नियमितपणे आढावा घेऊन पाठपुरावा करावा. प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांनी त्यांच्या अधिनस्त पदनिर्देशित अधिकाऱ्यांच्या कामगिरीचा वार्षिक आढावा घ्यावा, असेही डॉ. जाधव यांनी सांगितले.

प्रथम अपिलीय अधिकाऱ्यांकडे येणाऱ्या प्रत्येक प्रकरणाची सुनावणी घेऊन अर्जदाराला योग्य मार्गदर्शन व समुपदेशन करावे. अर्ज किंवा आवश्यक कागदपत्रांमधील त्रुटींची माहिती नसल्यामुळे अनेकदा अपिले दाखल होतात. त्यामुळे अर्जदारांना त्रुटी समजावून सांगून योग्य मार्गदर्शन करणे आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

ग्रामीण भागातील नागरिकांना अधिसूचित सेवांचा लाभ अधिक वेगाने मिळावा, यासाठी ग्रामस्तरीय अधिकाऱ्यांसाठी कार्यपद्धती निश्चित करावी. तसेच त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या अर्जांचा तातडीने निपटारा होण्यासाठी नियमित आढावा घ्यावा, अशा सूचनाही डॉ. जाधव यांनी दिल्या.

अधिसूचित सेवांबाबतच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी डॉ. किरण जाधव यांनी लातूर येथील जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख कार्यालयाला भेट दिली. यावेळी त्यांनी अधिकारी व कर्मचाऱ्यांशी संवाद साधून महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमांतर्गत सुरू असलेल्या कामकाजाचा आढावा घेतला आणि आवश्यक मार्गदर्शन केले.

यावेळी भूमी अभिलेख उपअधीक्षक तथा प्रभारी जिल्हा अधीक्षक भूमी अभिलेख वैशाली गवई, उदगीरचे उपअधीक्षक किशोरकुमार कोरे, रेणापूरच्या उपअधीक्षक रेश्मा शिंदे, औसाचे उपअधीक्षक निखिल मोरे आदी उपस्थित होते.

# अपहरण करून खून!

**लातूर :** शहरातील कन्हेरी चौक परिसरात प्रेमसंबंधाच्या संशयातून तरुणाचे अपहरण करून खून केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे.

पोलिसांच्या नोंदीनुसार, माधव ऊर्फ नितीन धनाजी संगमे (वय ३२) याला विठ्ठल-रुक्मिणी मंदिर परिसरातून चारचाकी वाहनातून नेण्यात आले. त्यानंतर बर्दापूर येथील खडी केंद्रावर नेऊन रॉड, बेल्ट आणि काठीने मारहाण करून त्याचा खून केल्याचा आरोप आहे. या प्रकरणी पृथ्वीराज देशमुख, धवल देशमुख, प्रथमेश रेड्डी आणि आदित्य भालके यांच्याविरुद्ध शिवाजीनगर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आरोपींनी संगनमत करून नितीन याचे अपहरण केले आणि त्यानंतर त्याच्यावर प्राणघातक हल्ला केल्याचा आरोप आहे.

घटनेनंतर पोलिस अधिकाऱ्यांनी घटनास्थळी भेट देऊन तपासाला सुरुवात केली असून, पोलीस निरीक्षक कामत यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे. लातूरमध्ये वाढत चाललेल्या गंभीर गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर या घटनेने पुन्हा एकदा कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न ऐरणीवर आणला आहे.

# विकृतीला पाठिशी नाही, न्यायाचा लढा सुरू

**लातूर :** लातूर येथील 'आदर्श कॅम्पस'मध्ये शिक्षण क्षेत्राला काळिमा फासणाऱ्या संस्थाचालक बशीर शेखने अनेक विद्यार्थिनींवर दबाव टाकून गैरवर्तन केल्याचा संतापजनक प्रकार समोर आला असून, त्याच्यावर पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल झाला आहे.

या गंभीर प्रकरणाची दखल घेत आज आम्ही लातूर जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. शिवकुमार जाधव आणि त्यांच्या संपूर्ण टीमची भेट घेतली. अशा विकृत आरोपीचे लातूरमधील कोणत्याही वकिलाने वकिलीपत्र स्वीकारू नये, अशी आग्रही विनंती आम्ही केली. आमच्या या मागणीला ॲड. शिवकुमार जाधव व त्यांच्या टीमने अत्यंत सकारात्मक प्रतिसाद देत पीडित मुलींच्या न्यायाच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचा निर्णय घेतला. या सामाजिक व संवेदनशील भूमिकेबद्दल वकील मंडळाचे आभार मानले. सर्व पीडित मुलींना न्याय मिळेपर्यंत आणि आरोपीला



कठोर शिक्षा होईपर्यंत हा लढा असाच सुरू राहील.

याप्रसंगी वकील मंडळाचे उपाध्यक्ष ॲड. लहुजी चामे, सहसचिव ॲड. सिद्धेश्वर धायगुडे, महिला सचिव ॲड. श्रद्धा कोरे पाटील, ॲड. वाय. डी. जगताप, ॲड. नितीन राठोड, ॲड. मंजुषा शिंदे, ॲड. सचिन कांबळे, ॲड. प्रदीप पाटील, ॲड. निलेश मुचाटे, ॲड. ललित तोष्णिवाल, ॲड. अभय खानापुरे, ॲड. शशांक जोशी ॲड. अमित साळुंके, ॲड. अमित आर्वीकर, ॲड. नयना देवताळकर, ॲड. प्रकाश काळे, ॲड. मेघा पाठणकर, ॲड. मंदार मैंदरकर, ॲड. गणेश गोजमगुंडे इ. वकील बंधू-भगिनी उपस्थित होते.

# घाबरू नका; सरकार पाठिशी आहे : ना. पंकजाताई मुंडे

**बीड जिल्ह्यातील दुष्काळ पाहून ना. पंकजाताई मुंडे हेलावल्या**

**बीड :** राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे आज सलग दुसऱ्या दिवशी शेतकऱ्यांच्या बांधावर होत्या. शेतातील पीक पूर्णपणे



हातातून गेले हे सांगताना शेतकऱ्यांच्या भावना अनावर झाल्या होत्या. शेतकऱ्यांवर ओढवलेले संकट पाहून ना. पंकजाताई मुंडे यांचे मन देखील हेलावले. अशा परिस्थितीत घाबरू नका, सरकार पूर्णपणे तुमच्या पाठिशी आहे, आवश्यक ती सर्व मदत तुमच्यापर्यंत पोहोचवली जाईल अशा शब्दांत त्यांनी शेतकऱ्यांना आधार दिला.

ना. पंकजाताई मुंडे यांनी आज दुसऱ्या दिवशी मोरवड, पुसरा (वडवणी), तेलगाव (धारूर), नित्रुड, पात्रुड, हरकी लिमगाव (माजलगांव), मारफळा तांडा, अर्धमसला (गेवराई) आदी ठिकाणी शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन नुकसानीची पाहणी केली. शेतातील पीके पूर्णपणे हातातून गेल्याने शेतकरी हताश झाला आहे, ना. पंकजाताईंना पाहून अनेक शेतकऱ्यांना अश्रू अनावर झाले.

राज्य सरकारने राज्यामध्ये दुष्काळ जाहीर केलेला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस शेतकरी आणि जनतेला मदत करण्यासाठी विविध उपाय योजना आखत आहेत. त्यामध्ये पीक कर्जांचे पुनर्गठन, जमीन महसूलात सवलत, शालेय विद्यार्थ्यांना परीक्षा फी माफी, वीज पंपांच्या बिलात सवलत, जलसंधारणाच्या कामांना गती, दुष्काळामुळे वाळलेल्या पिकांचे पंचनामे करून नुकसान भरपाई देणे यासारखी कामे केली जाणार आहेत. हे बळीराजाचे सरकार आहे. त्यामुळे तुम्हाला आम्ही वाऱ्यावर सोडणार नाहीत, आवश्यक ती सर्व मदत तुमच्यापर्यंत पोहोचवू असं पंकजाताई मुंडे यांनी यावेळी सांगत शेतकऱ्यांना आधार दिला.

या दौऱ्यात माजी आमदार केशवराव आंधळे, बदामराव पंडित, माधव निर्मळ, बाळदादा पवार, युद्धजित पंडित, संजय आंधळे, रूपाली कचरे, बाळासाहेब चोले, उप विभागीय अधिकारी, तहसीलदार उपस्थित होते.

# जिल्ह्यातील दिव्यांग बांधवांसाठी युडीआयडी कार्ड शिबिरांचे आयोजन

**लातूर :** राज्य शासनामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर दरम्यान राबविण्यात येत असलेल्या 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत लातूर जिल्ह्यातील सर्व १० तालुक्यांमधील दिव्यांग बांधवांना युनिक डिझॅबिलिटी आयडी (युडीआयडी) प्रमाणपत्र वितरीत करण्यासाठी जिल्हा परिषदेच्या दिव्यांग सक्षमीकरण विभागाकडून विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या अभियानांतर्गत लातूर तालुक्यासाठी ऑक्टोबर महिन्यातील प्रत्येक शुक्रवारी विशेष शिबीर पार पडणार आहे. निलंगा व शिरूर अनंतपाळ तालुक्यासाठी निलंगा येथील उपजिल्हा रुग्णालयात ७ ऑक्टोबर २०२६ रोजी शिबीर आयोजित केले जाणार आहे. यासोबतच उदगीर, देवणी व जळकोट तालुक्यांसाठी उदगीर येथील सामान्य रुग्णालयात १४ ऑक्टोबर रोजी, तर अहमदपूर व चाकूर तालुक्यांसाठी १६ ऑक्टोबर रोजी अहमदपूर येथील ग्रामीण रुग्णालयात विशेष शिबीर होणार आहे. तसेच रेणापूर येथील ग्रामीण रुग्णालयात २८ ऑक्टोबर रोजी आणि औसा येथील ग्रामीण रुग्णालयात ३० ऑक्टोबर रोजी या विशेष शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे.

या सर्व १० तालुक्यांतील संबंधित दिव्यांग बांधवांनी युडीआयडी कार्ड मिळवण्यासाठी आयोजित या विशेष शिबिरांमध्ये नोंदणी करून आपले प्रमाणपत्र प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन लातूर जिल्हा परिषदेच्या दिव्यांग सक्षमीकरण विभागामार्फत करण्यात आले आहे.

# अज्ञात वाहनाच्या धडकेत तीन सख्ख्या भावांचा मृत्यू

**नेवासा :** नेवासा तालुक्यातील पुनतगाव फाट्याजवळ गुरुवारी रात्री झालेल्या भीषण अपघातात १२, १४ आणि १६ वर्षीय तीन सख्ख्या भावांचा दुर्दैवी मृत्यू झाला. नातेवाईकांकडे जात असताना त्यांच्या नव्या बुलेटला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. या घटनेने माळीचिंचोरा परिसरावर शोककळा पसरली आहे.

आदित्य अंबादास आहिरे (१६), दीपक अंबादास आहिरे (१४) आणि चैतन्य अंबादास आहिरे (१२) अशी मृत भावांची नावे आहेत.

माळीचिंचोरा येथील अंबादास आहिरे यांनी घरगुती वापरासाठी काही दिवसांपूर्वीच नवीन



दुचाकी खरेदी केली होती. नवीन गाडी घरी आल्याने कुटुंबात आनंदाचे वातावरण होते. गुरुवारी रात्री तिन्ही भाऊ याच दुचाकीवरून राहाता येथील नातेवाईकांकडे जात होते.

**नव्या बुलेटचा आनंद ठरला अखेरचा; अज्ञात वाहनाच्या धडकेत तीन सख्ख्या भावांचा मृत्यू**

नेवासा-श्रीरामपूर मार्गावर पुनतगाव फाट्याजवळ त्यांच्या दुचाकीला अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिली. धडक एवढी भीषण होती की दुचाकीचा चक्काचूर झाला. अपघातानंतर अज्ञात वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. गंभीर जखमी झालेल्या तिन्ही भावांना नेवासा फाटा येथील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले; मात्र वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यांना मृत घोषित केले. शुक्रवारी तिन्ही भावांवर शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले. या प्रकरणी नेवासा पोलिस ठाण्यात अज्ञात वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पसार झालेल्या वाहनाचा व चालकाचा शोध सुरू आहे. नवी दुचाकी घरात येऊन अवघे काही दिवस झाले असतानाच तीन भावांचा असा दुर्दैवी अंत झाल्याने कुटुंबीयांवर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

# उदगीर येथे अवैध सावकारी प्रकरणी छापा

**सहकार व पोलिस विभागाची संयुक्त कारवाई**

**लातूर :** जिल्ह्यातील उदगीर तालुक्यातील कथित विनापरवाना अवैध सावकारी व्यवहाराबाबत सहकार विभागाकडे प्राप्त झालेल्या तक्रारीच्या चौकशी अनुषंगाने महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम २०१४ च्या कलम १६ अंतर्गत कार्यवाही करण्यात आली आहे. उदगीर येथील मिनी उद्योग भवनजवळील रहिवासी सुधीर जगन्नाथ पारसेवार यांच्या विरोधात दाखल झालेल्या तक्रारीनुसार सहकार विभाग आणि पोलिस विभागाच्या संयुक्त पथकाने ५ ऑक्टोबर २०२६ रोजी त्यांच्या राहत्या घरी झडती व तपासणी मोहीम राबवली.

या झडती कारवाईदरम्यान पुढील चौकशीसाठी संशयित असलेले कोरे बॉन्ड, कोरे चेक, व्याजाचा उल्लेख असलेल्या हिशोब वह्या आणि खरेदी-विक्री दस्तऐवजांच्या प्रती ताब्यात घेण्यात आल्या असून सावकारी कायद्यांतर्गत पुढील कायदेशीर चौकशी केली जाणार आहे. लातूरचे जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड आणि पोलिस अधीक्षक अमोल तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच विभागीय सहनिबंधक नानासाहेब चव्हाण व जिल्हा उपनिबंधक विष्णू पोतांगळे यांच्या नियंत्रणाखाली ही कारवाई करण्यात आली.

या मोहिमेत उदगीरचे तहसीलदार राम बोरगावकर आणि शहर पोलिस स्टेशनचे पोलिस निरीक्षक यांनी आवश्यक प्रशासकीय मदत पुरवली, तर पथक प्रमुख म्हणून अश्विनी पुढेवाड यांनी कामकाज पाहिले. तसेच शासकीय दूध योजना विभागातील कर्मचाऱ्यांनी पंचाची भूमिका बजावली. जर कोणी अवैध सावकारी करत असेल तर त्याबाबत लातूर येथील जिल्हा निबंधक किंवा प्रत्येक तालुक्यातील सहायक निबंधक कार्यालयाकडे गोपनीय स्वरूपात तक्रार नोंदवावी. तक्रारदाराचे नाव पूर्णपणे गोपनीय ठेवून दोषींवर तात्काळ कायदेशीर कारवाई केली जाईल, असे आवाहन सहकार विभागाच्यावतीने करण्यात आले आहे.



# अवैध सावकारीविरोधातील मोहीम तीव्र करा

## तक्रारींवर विनाविलंब कार्यवाही होणे आवश्यक : जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांच्या सूचना

**लातूर :** दुष्काळी परीस्थितीत बँकांनी पीक कर्जाचे पुनर्गठन करावे, तसेच शेतीशी निगडीत कर्जाच्या वसुलीला स्थगिती देण्याबाबत राज्य शासनाने निर्देश दिले आहेत. सर्व बँकांनी त्यानुसार आवश्यक कार्यवाही करावी. तसेच पात्र शेतकऱ्यांना कोणत्याही अडथळ्याशिवाय कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशा सूचना जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड यांनी आज येथे दिल्या. तसेच अवैध सावकारीला आळा घालण्यासाठी सहकार विभागाने मोहीम स्वरुपात कार्यवाही करावी, अशा सूचनाही त्यांनी दिल्या.

अवैध सावकारी व कर्ज वाटपाचा आढावा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस अधीक्षक अमोल तांबे, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त राहूल कुलकर्णी, निवासी उपजिल्हाधिकारी केशव नेटके, उपजिल्हाधिकारी अहिल्या गाठाळ, उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे, मंजुषा लटपटे, अविनाश कोरडे,

**बँकांनी पात्र शेतकऱ्यांना विनाअडथळा कर्ज उपलब्ध करून द्यावे; शेतीशी निगडीत कर्जासाठी ऑनलाईन अर्ज करण्याची सुविधा**

सुशांत शिंदे, शरद झाडके, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दिलीप जाधव, जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था विष्णू पोतंगले यांच्यासह संबंधित विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेचा लाभ मिळालेल्या शेतकऱ्यांना, तसेच इतरही पात्र शेतकऱ्यांना शेतीशी निगडीत कर्ज सहज उपलब्ध होण्यासाठी बँकांनी




आवश्यक कार्यवाही करण्याची गरज आहे. शेती विषयक कर्जासाठी आता कृषिका आणि जनसमर्थ पोर्टलद्वारे ऑनलाईन अर्ज करण्याची संधी उपलब्ध आहे. 'ॲग्रिस्टॅक' फार्मर शेतकरी स्वतः मोबाईलद्वारे किंवा आपले सरकार सेवा केंद्रातून कर्जासाठी ऑनलाईन अर्ज करू शकतात. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांनी ऑनलाईन स्वरुपात अर्ज करावेत, असे जिल्हाधिकारी म्हणाले.

अवैध सावकारीबाबत नागरिकांनी तालुकास्तरावर सहायक निबंधक कार्यालय अथवा जिल्हा स्तरावर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांच्या कार्यालयाकडे तक्रार दिल्यास त्यांचे नाव गोपनीय ठेवून पुढील कार्यवाही करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले. तसेच अवैध सावकारीबाबत प्राप्त तक्रारींवर संबंधित सहायक निबंधकांनी त्वरित कार्यवाही करून त्याबाबतचा अहवाल सादर करणे आवश्यक आहे. यामध्ये दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही, असे त्यांनी स्पष्ट केले.

लातूर जिल्ह्यात ३७३ परवानाधारक सावकार असून त्यांनी ३५३४ जणांना १९ कोटी ७१ लाख रुपयांचे कर्ज वितरण केले आहे. परवानाधारक सावकाराकडून कर्ज घेताना कोणत्या बाबींची पूर्तता करणे आवश्यक आहे, याबाबत जनजागृती करावी. यामध्ये कर्ज स्वरूपानुसार व्याज दर, कर्जासाठी आवश्यक कागदपत्रे याबाबत माहिती द्यावी. कोणत्याही प्रकरणात कर्जदाराची फसवणूक अथवा अडवणूक होवू नये, यासाठी याची दक्षता घ्यावी. नियमबाह्य पद्धतीने केल्या सावकारीला पायबंद घालण्यासाठी तातडीने आवश्यक कार्यवाही करावी, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड म्हणाले. तसेच सर्व परवानाधारक सावकारांकडून करण्यात आलेल्या कर्ज वितरणाची पडताळणी करून याबाबतचा अहवाल तातडीने सादर करावा, अशा सूचना जिल्हाधिकाऱ्यांनी दिल्या.

सावकारी परवाना दिल्यानंतर त्या अनुषंगाने आवश्यक पडताळणी नियमितपणे करावी. ज्यांच्या नावे परवाना तेच सावकारकी करतात का, याची खात्री करावी. तसेच ज्यांच्यावर गुन्हे दाखल होतील, त्यांना सावकारी परवाना देवू नये किंवा त्यांचा परवाना नूतनीकरण करू नका. तसेच सहाय्यक निबंधक यांनी परवानधारक सावकारांच्या कर्ज व्यवहाराची अचानक तपासणी करून नियमांचे पालन होत असल्याची खात्री करावी, असे पोलीस अधीक्षक अमोल तांबे यांनी सांगितले.

सावकाराकडून तारण अथवा विनातारण कर्ज घेण्यासाठी जमिनीचे खरेदीखत करून देण्याची आवश्यकता नाही. मात्र, तरीही काहीवेळा कर्ज देताना जमिनीचे खरेदीखत करून घेतले जाते. अशाप्रकारे नियमबाह्य पद्धतीने खरेदीखत केले असल्यास ते खरेदीखत रद्द करण्याबाबत कार्यवाही सुरू करण्यात येईल. तसेच संबंधित सावकाराविरुद्ध नियमानुसार तातडीने कठोर कारवाई केली जाईल, असे जिल्हाधिकारी डॉ. बास्टेवाड यांनी सांगितले.

## नळाला येणारे पाणी प्रत्यक्ष पिऊन अधिकाऱ्यांनी केली खात्री



**लातूर :** शहरातील उपलब्ध पाणीसाठा आणि संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पुढील नियोजनाच्या दृष्टीने लातूर शहरातील ११ जलकुंभांची पाहणी करण्यात आली. अप्पर जिल्हाधिकारी शिल्पा करमरकर आणि महानगरपालिका उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांनी आज सकाळी ७ वाजल्यापासून विविध जलकुंभांना भेट देऊन पाहणी केली.

**लातूरमध्ये जलकुंभांची पाहणी**

या पाहणीदरम्यान प्रत्येक जलकुंभावरील दैनंदिन व्यवस्थापन, कर्मचारी वर्ग आणि येणाऱ्या अडचणींचा आढावा घेण्यात आला. तसेच संबंधित जलकुंभातून त्या-त्या भागात वेळेवर पाणीपुरवठा होत आहे की नाही, याचीही खात्री करण्यात आली. पाणीपुरवठा सुरू असलेल्या वॉर्डमध्ये अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष भेटी देऊन नागरिकांशी संवाद साधला. नळाला स्वच्छ पाणीपुरवठा होत आहे की नाही, याची खात्री करण्यासाठी अधिकाऱ्यांनी नळाचे पाणी प्रत्यक्ष पिऊन तपासणी केली. तसेच जलकुंभातून पाणी सोडण्यात येणाऱ्या विविध प्रभागांना भेट देऊन नागरिकांच्या समस्या आणि पाणीपुरवठ्याबाबतची माहिती जाणून घेण्यात आली.

दरम्यान, काही नागरिकांकडून विनाकारण पाणी वाया घालवले जात असल्याचे निदर्शनास आले. रस्त्यावर पाणी सोडणे, वाहने धुण्यासाठी मोठ्या प्रमाणात पाण्याचा वापर करणे अशा प्रकारे पाणी वाया घालवू नये, असे आवाहन अधिकाऱ्यांनी नागरिकांना केले. पाण्याचा प्रत्येक थेंब जपून वापरावा आणि भविष्यातील संभाव्य पाणीटंचाई लक्षात घेऊन पाण्याची बचत करावी, असे आवाहन करण्यात आले.

या पाहणीदरम्यान कार्यकारी अभियंता गणेश देवणीकर, कनिष्ठ अभियंते क्षितिज कटके, प्रविण चव्हाण, जलकुंभ प्रमुख तसेच संबंधित कर्मचारी उपस्थित होते.

## ऑटो रिक्षांची वाहतूक नियंत्रण शाखेकडून कसून तपासणी



**लातूर :** लातूर शहरातील वाढत्या वाहतुकीच्या पार्श्र्वभूमीवर ऑटो रिक्षांच्या नियमबद्धतेकडे वाहतूक नियंत्रण शाखेने विशेष लक्ष केंद्रित केले असून, शहरातील ऑटो रिक्षांची कसून तपासणी सुरू केली आहे. प्रवाशांना सुरक्षित व शिस्तबद्ध सेवा मिळावी, यासाठी वाहनांची कागदपत्रे तसेच वाहतूक नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी करण्यात येत आहे.

तपासणीदरम्यान विना परवाना ऑटो रिक्षा चालविणे, वाहनावरील प्रलंबित दंड न भरता वाहन चालविणे, चालकाकडून निर्धारित युनिफॉर्मचा वापर न करणे आदी बाबींवर विशेष लक्ष दिले जात आहे. नियमांचे उल्लंघन आढळल्यास संबंधित चालकांविरुद्ध नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे.

याशिवाय काही ऑटो रिक्षांमध्ये मोठ्या आवाजात साऊंड सिस्टिमचा वापर तसेच अनधिकृत रंगीबेरंगी किंवा भडक लाईट लावल्याचे प्रकारही निदर्शनास येत आहेत. अशा नियमबाह्य प्रकारांवरही वाहतूक नियंत्रण शाखेची नजर असून, संबंधितांवर कारवाई करण्याचा इशारा पोलिसांनी दिला आहे.

ऑटो चालकांनी वैध ड्रायव्हिंग लायसन्स, परमिट व आवश्यक कागदपत्रे सोबत ठेवावीत. वाहनावर प्रलंबित दंड असल्यास तो भरावा, निर्धारित युनिफॉर्मचा वापर करावा, मोठ्या आवाजाची साऊंड सिस्टिम तसेच अनधिकृत रंगीबेरंगी लाईटचा वापर करू नये, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.

नागरिकांना वाजवी दरात सुरक्षित आणि शिस्तबद्ध प्रवासी सेवा देणे ही ऑटो चालकांची जबाबदारी आहे. त्यामुळे सर्व ऑटो चालकांनी वाहतूक नियमांचे पालन करून पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. नियमांचे उल्लंघन करणाऱ्या चालकांविरुद्ध यापुढेही नियमानुसार कारवाई केली जाणार असल्याचे लातूर पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

## 'आरसीसी'च्या क्लासेसवरही कारवाईची कृती समितीची मागणी

**लातूर :** लातूर मनपा प्रशासनाने आदर्श शिक्षण संस्था व संबंधित व्यक्तींच्या मालमत्तांबाबत परवाने सादर करण्याची नोटीस बजावल्याच्या पार्श्र्वभूमीवर 'शहीद अहमद खान पठाण कृती समिती' तर्फे मनपा प्रशासनाच्या निर्णयाचे स्वागत करण्यात आले. यावेळी संबंधित अधिकाऱ्यांचा सत्कार करून प्रशासनाने नियमांची अंमलबजावणी करताना कोणताही भेदभाव न करता सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करावी, अशी भूमिका मांडण्यात आली.

यासोबतच छएएढ पेपरफुटी प्रकरणाशी संबंधित असल्याचे आरोप असलेल्या मोटेगावकर क्लासेस व संबंधित मालमत्तांचीही कायदेशीर पद्धतीने तपासणी करून, नियमभंग आढळल्यास आदर्श शिक्षण संस्थेप्रमाणेच कठोर कारवाई करावी, अशी मागणी कृती समितीने केली. विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी संबंधित कोणत्याही प्रकरणात दोष सिद्ध झाल्यास कायद्यानुसार जबाबदारी निश्चित करून कारवाई व्हावी, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

## युडीआयडी कार्ड शिबिरात २८ दिव्यांगांना कार्ड वितरण

**लातूर :** दिव्यांग बांधवांना शासनाच्या विविध योजना, सवलती आणि कल्याणकारी सुविधांचा लाभ सुलभतेने मिळावा या उद्देशाने 'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत लातूर जिल्हा परिषदेचा दिव्यांग सक्षमीकरण विभागाच्यावतीने निलंगा येथील उपजिल्हा रुग्णालयात युडीआयडी कार्ड वितरण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात ८० दिव्यांग बांधवांची नोंदणी करण्यात आली, तसेच यापूर्वी नोंदणी केलेल्या २८ जणांना प्रत्यक्ष कार्ड वितरण करण्यात आले.

लातूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुल कुमार मीना आणि जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सुजाता पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या शिबिरामध्ये विविध प्रकारच्या दिव्यांगत्वानुसार तज्ज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून दिव्यांग लाभार्थ्यांची आवश्यक वैद्यकीय तपासणी करून युडीआयडी कार्ड वितरणासंदर्भात पुढील कार्यवाही करण्यात आली. या




प्रसंगी जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण विभागाचे राजू गायकवाड, अस्थिरोग तज्ज्ञ डॉ. शशिकांत डांगे, मानसोपचार तज्ज्ञ डॉ. शीतल तळीखेडकर, बालरोग तज्ज्ञ डॉ. प्रल्हाद साळुंखे, प्रभारी अधिकारी डॉ. पाटील, श्रीमती बीटे यांच्यासह अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक राजू गायकवाड यांनी केले; त्यांनी सेवा संकल्प अभियानाचा उद्देश स्पष्ट करत दिव्यांग व्यक्तींसाठी शासनामार्फत राबविल्या जाणाऱ्या विविध योजना, सेवा आणि सुविधांची सविस्तर माहिती दिली.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अनिल कुंभारी यांनी केले. कार्यक्रमाच्या शेवटी हिराकांत थिटे यांनी आभार मानले.

## अवैध सावकारीला आळा घालून निपटारा करा

### सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचे अधिकाऱ्यांना निर्देश



**मुंबई :** राज्यातील अवैध सावकारीला आळा घालून शेतकरी व नागरिकांना सुलभ आणि जलद न्याय मिळवून देण्यासाठी प्रलंबित प्रकरणांचा तातडीने निपटारा करावा, असे निर्देश सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी दिले. मंत्रालयात झालेल्या बैठकीत अवैध सावकारीविरोधातील कारवाई आणि प्रकरणनिहाय सद्यस्थितीचा आढावा घेण्यात आला.

अवैध सावकारीच्या प्रकरणांसाठी स्पष्ट व निश्चित निकष ठरवून जिल्हा उपनिबंधकांनी गतीने निर्णय घ्यावेत, अशा सूचना मंत्री पाटील यांनी दिल्या. वरकरणी नियमित खरेदी-विक्रीचे दिसणारे मात्र प्रत्यक्षात अवैध सावकारीशी संबंधित जमीन व्यवहार रोखण्यासाठी संबंधित यंत्रणांनी दक्षतेने कार्यवाही करावी. प्रलंबित प्रकरणांचा तातडीने अहवाल मागवून ती गतीने निकाली काढण्यासाठी पाठपुरावा करावा, असेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखालील समित्यांना पोलीस प्रशासनाने आवश्यक सहकार्य करावे. दुष्काळी परिस्थितीत अवैध सावकारीला आळा घालण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांनी नियमित बैठका घेऊन आढावा घ्यावा. महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम, २०१४ अंतर्गत तक्रारी, गुन्हे दाखल करणे, चौकशी तसेच बळकावलेल्या जमीन-मालमत्ता परत मिळवून देण्याची कार्यवाही सुरू असून, अवैध सावकारीला प्रतिबंध करून शेतकरी व सामान्य नागरिकांना न्याय मिळवून देणे हे शासनाचे सर्वोच्च प्राधान्य असल्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी स्पष्ट केले.

यावेळी आमदार बच्चू कडू उपस्थित होते. दूरदृश्य प्रणालीद्वारे अकोला, लातूर येथील जिल्हा उपनिबंधक तसेच संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## लातूरमध्ये १०, ११ ऑक्टोबरला विशेष मतदार नोंदणी शिबीर

**लातूर :** लातूर शहर विधानसभा मतदारसंघात १० आणि ११ ऑक्टोबर २०२६ रोजी विशेष मतदार नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले आहे. मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षण कार्यक्रमांतर्गत प्रत्येक मतदान केंद्रावर बीएलओंच्या माध्यमातून नागरिकांना नाव नोंदणी आणि मतदार यादीतील दुरुस्तीबाबत मार्गदर्शन केले जाणार आहे.

विशेषतः १ ऑक्टोबर २०२४ नंतर वयाची १८ वर्षे पूर्ण झालेल्या नवमतदारांना मतदार यादीत नाव नोंदवण्याची संधी मिळणार आहे. लातूर शहरातील विविध महाविद्यालयांमध्येही नवमतदारांसाठी विशेष नोंदणी शिबिरे आयोजित केली जाणार आहेत. मतदार यादीत नवीन नाव समाविष्ट करण्यासाठी नमुना क्र. ६, तर नोंदींमध्ये दुरुस्तीसाठी नमुना क्र. ८ उपलब्ध आहे. नागरिकांना ऑफलाईन तसेच ऑनलाईन अर्ज करण्यासाठी मार्गदर्शन केले जाणार आहे. नागरिकांच्या सोयीसाठी लातूर तहसील कार्यालयात विशेष मतदार मदत कक्ष स्थापन केला आहे. नोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे व लातूर रहिवासाचे घोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे. सर्व पात्र नवमतदार आणि नागरिकांनी १० व ११ ऑक्टोबरच्या विशेष शिबिरांचा लाभ घेऊन मतदार यादीत आपले नाव नोंदवावे, असे आवाहन उपविभागीय अधिकारी रोहिणी नऱ्हे-विरोळे यांनी केले आहे.

## दुष्काळी परिस्थितीचा धिरज देशमुखांकडून आढावा

**लातूर :** सध्याच्या दुष्काळी परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शेतकरी, शेतमजूर व सर्वसामान्य नागरिकांच्या विविध प्रश्नांचा आढावा घेण्यासाठी माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख यांनी लातूर येथील काँग्रेस भवनात जिल्हा परिषद, पंचायत समिती सदस्य व काँग्रेस पदाधिकारी यांची बैठक घेतली. जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष अभय साळुंके यांच्या अध्यक्षतेखाली ही बैठक पार पडली.

बैठकीत जिल्ह्यातील दुष्काळी परिस्थिती, पिकांची स्थिती, पाणीटंचाई, चारा उपलब्धता, पीकविमा, शैक्षणिक शुल्क, रेशनचा प्रश्न तसेच विविध शासकीय योजनांचे प्रलंबित अनुदान याबाबत जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य तसेच काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून आढावा घेण्यात आला.

अनेक गावांमध्ये नागरिकांना रेशन उपलब्ध होत नसल्याच्या तक्रारी असून, विविध शासकीय योजनांचे



अनुदानही प्रलंबित आहे. हे अनुदान तातडीने लाभार्थ्यांना मिळावे, अशी मागणी यावेळी करण्यात आली. तसेच दुष्काळाच्या गंभीर परिस्थितीत नागरिकांना आवश्यक पाणी व चारा उपलब्ध करून देण्यासाठी प्रशासनाने तत्परतेने उपाययोजना कराव्यात, यावरही चर्चा झाली.

सध्या पीकविम्याच्या अनुषंगाने कापणी प्रयोग सुरू आहेत. मात्र दुष्काळाची व्यापकता लक्षात घेता केवळ कापणी प्रयोगाच्या आधारे मदत न करता बाधित शेतकऱ्यांना सरसकट पीकविम्याचा लाभ मिळावा, अशी मागणी बैठकीत करण्यात आली. शेतकऱ्यांना तातडीने दिलासा मिळण्यासाठी शासनाने याबाबत सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी अपेक्षाही व्यक्त करण्यात आली.

दुष्काळाचे संकट मोठे असून, या परिस्थितीत शासन व प्रशासनाने संवेदनशीलतेने काम करून शेतकरी, शेतमजूर आणि सर्वसामान्य नागरिकांना आवश्यक ती मदत तातडीने उपलब्ध

**दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर शेतकरी व नागरिकांच्या प्रश्नांवर तातडीच्या उपाययोजनांची मागणी**

करून देणे गरजेचे आहे. काँग्रेसचे पदाधिकारी, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य गावागावात नागरिकांच्या समस्या जाणून घेत असून, विविध उपाययोजनांसाठी प्रशासनाकडे पाठपुरावा करीत आहेत.

या बैठकीत दुष्काळग्रस्त नागरिकांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी पुढील काळात अधिक प्रभावीपणे काम करण्याबाबतही चर्चा करण्यात आली. बैठकीस काँग्रेस जिल्हा परिषद सदस्य, पंचायत समिती सदस्य, पदाधिकारी आदींची उपस्थिती होती.

# गोपीनाथराव मुंडे साहेबांचे विचार आजही जिवंत

## त्यांच्या तालमीत घडलेल्या कार्यकर्त्यांमध्ये माणुसकीची परंपरा कायम

**लातूर :** लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेबांचे विचार, कार्यपद्धती आणि सर्वसामान्य कार्यकर्त्यांशी असलेली आपुलकी आजही अनेक कार्यकर्त्यांच्या आचरणातून दिसून येते. मुंडे साहेबांच्या संपर्कात आलेला कार्यकर्ता त्यांच्या विचारांचा आणि आदर्शांचा ठसा आयुष्यभर जपतो, याचा प्रत्यक्ष अनुभव मला अनेक वेळा आला आहे. सन २०१४ च्या लोकसभा निवडणुकीच्या काळात भारतीय जनता पार्टीकडून लातूर लोकसभा मतदारसंघातून उमेदवारी मिळावी, अशी इच्छा मुंडे साहेबांचे विश्वासू कार्यकर्ते रमेश सोनवणे यांनी व्यक्त केली होती. या संदर्भात आम्ही संभाजीनगर येथील एका हॉटेलमध्ये मुंडे साहेबांची भेट घेतली होती. त्यावेळी उमेदवारीबाबत चर्चा झाली. साहेबांनी स्पष्टपणे सांगितले की, मी दुसऱ्याला शब्द दिला आहे; मात्र तुम्ही काम करत राहा. रमेश, तुला मोठी जबाबदारी देण्याचे काम माझे आहे.

या संवादाचा मी स्वतः प्रत्यक्ष साक्षीदार आहे. मुंडे साहेब आज आपल्यात असते तर रमेश सोनवणे यांच्यासारख्या निष्ठावंत कार्यकर्त्याला निश्चितच मोठी जबाबदारी मिळाली असती, असे मला वाटते. कारण रमेश सोनवणे हे सामान्य कुटुंबातून पुढे आलेले, मुंडे



साहेबांच्या विचारांवर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टीचे काम करणारे कार्यकर्ते आहेत. त्यांनी रेणापूर पंचायत समितीचे सभापतीपदही सांभाळले आहे. मुंडे साहेबांची एक मोठी शिकवण म्हणजे कार्यकर्ता छोटा किंवा मोठा नसतो; प्रत्येकाचा सन्मान केला पाहिजे. ही माणुसकी त्यांच्या सहवासात राहिलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी आजही जपली आहे. याचाच अनुभव मला नुकताच आला. मुंडे साहेबांच्या तालमीत घडलेले कार्यकर्ते रमेश सोनवणे यांच्या एमआयडीसी परिसरातील निवासस्थानी जाण्याचा योग आला. रमेश सोनवणे हे कामानिमित्त बाहेरगावी होते. मात्र त्यांचे धाकटे चिरंजीव बाळासाहेब सोनवणे घरी उपस्थित होते. त्यांनी मला पाहताच काका या आपुलकीने स्वागत केले. चहा-पाण्याची व्यवस्था करून सन्मानाने बसवले.

दरम्यान, रमेश सोनवणे

**निजाम दस्तगीर शेख**
**संपादक, क्रांती निर्णय, लातूर**
**मो. ९४२२६३८७८६**

साहेबांनी फोनवरून आपल्या मुलाला सांगितले की, निजाम भाई आणि त्यांचे मित्र चहा घेतल्याशिवाय त्यांना जाऊ देऊ नका. या छोट्याशा प्रसंगातून मोठी माणुसकी अनुभवायला मिळाली.

आजच्या काळात अशा आपुलकीचे प्रसंग मनाला विशेष भावतात. माणसाचा पदापेक्षा माणूस म्हणून सन्मान करणे, कार्यकर्त्याला आपले मानणे आणि आलेल्या व्यक्तीचे प्रेमाने स्वागत करणे, ही मुंडे साहेबांच्या संस्कारांचीच देणगी असल्याचे मला वाटते.

मुंडे साहेबांच्या सहवासात घडलेल्या कार्यकर्त्यांमध्ये ही माणुसकी आजही जिवंत आहे. त्यांच्या विचारांचा वारसा केवळ भाषणांमध्ये नाही, तर अशा छोट्या-छोट्या कृतींमधूनही पुढे जात आहे. हे सर्व मी स्वतः जवळून पाहिले आहे आणि या प्रसंगांचा मी साक्षीदार आहे.

# लातूर जिल्ह्यात २६ बालकांवर यशस्वी मोफत शस्त्रक्रिया

**लातूर :** जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत 'सेवा संकल्प अभियान' राबविण्यात येत आहे. या अभियानाअंतर्गत नागरिकांना गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्याबरोबरच विविध आरोग्यविषयक उपक्रम जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागामार्फत राबवले जात आहेत. जिल्हाधिकारी डॉ. भारत बास्टेवाड व जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना यांच्या मार्गदर्शनाखाली हे उपक्रम सुरू आहेत. या अभियान काळात २६ बालकांवर यशस्वी मोफत शस्त्रक्रिया करण्यात आल्याने या चिमुकल्यांना नवे आयुष्य मिळाले आहे.

'सेवा संकल्प अभियाना'अंतर्गत 'राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रमा'द्वारे (आरबीएसके) ० ते १८ वयोगटातील मुलांची आरोग्य तपासणी केली जात आहे.

बालकांची तपासणी करून आजार, जन्मजात व्यंग व शारीरिक विकासातील अडचणींचे वेळेत निदान करणे आणि त्यावर योग्य उपचार व संदर्भ सेवा उपलब्ध करून देणे हा या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश आहे. आरबीएसकेअंतर्गत हृदयरोग, नेत्ररोग आणि फेफरे यांसारख्या आजारांसाठी विशेष शिबिरे आयोजित करून उपचार केले जातात.

अभियान कालावधीत जिल्ह्यातील अंगणवाड्या, तसेच शासकीय व निमशासकीय शाळांमधील ७५,६०० मुलांची आरोग्य तपासणी करण्यात आली. त्यांपैकी १२,३०० बालकांवर तपासणीदरम्यान औषधोपचार करण्यात आले. या तपासणीत हृदयाला छिद्र आढळलेल्या ३ बालकांवर पुणे येथील रुबी हॉल क्लिनिकमध्ये मोफत हृदयशस्त्रक्रिया करण्यात आली. याशिवाय अपेंडिक्स (०४), क्लेफ्ट पॅलेट/दुभंगलेले ओठ (०४), टूथ एक्स्ट्रॅक्शन (१३) आणि हर्निया (०२) अशा एकूण २६ बालकांवर इतर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आल्या.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी शिंदे, प्रभारी जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. सुजाता पाटील, जिल्हा माता व बाल संगोपन अधिकारी डॉ. नितीन बोडके, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. बालाजी बरुरे, सहायक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सुनील भागवत, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. अशोक सारडा व डॉ. आनंद कलमे यांच्या नेतृत्वाखाली या तपासणीचे नियोजन करण्यात आले.

### 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत चिमुकल्यांना मिळाले नवे आयुष्य



# धाराशिव येथे 'सेवा ज्योती यात्रा विकसित भारत संकल्प सभा'



**धाराशिव :** धाराशिव येथे आयोजित 'सेवा ज्योती यात्रा विकसित भारत संकल्प सभा' उत्साहपूर्ण वातावरणात पार पडली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे विचार ऐकले आणि विकसित भारताच्या संकल्पाशी अधिक दृढपणे जोडले जाण्याचा निर्धार केला. जनसेवेला केंद्रस्थानी ठेवत देशाच्या विकासाचा प्रवास अधिक वेगाने पुढे नेण्यासाठी 'विकसित भारत' या संकल्पाशी प्रत्येकाने जोडले जाण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशात सुरू असलेल्या विकासाच्या विविध उपक्रमांची दिशा आणि 'सेवा द्वारा समृद्ध भारत' या विचारातून राष्ट्रनिर्माणासाठी योगदान देण्याचा संकल्प सभेत करण्यात आला. विकास, आत्मनिर्भरता, आधुनिक पायाभूत सुविधा आणि सर्वसामान्यांच्या जीवनमानात सकारात्मक बदल घडवून आणण्याच्या या प्रवासात जनसहभाग महत्त्वाचा आहे.

यावेळी भाजपा धाराशीव जिल्हाध्यक्ष श्री.दत्ता कुलकर्णी, धाराशिव जि.प. अध्यक्ष सौ.अर्चनाताई पाटील, धाराशीव नगराध्यक्ष सौ. नेहाताई काकडे, माजी विधानपरिषद आमदार सुजितसिंग ठाकूर, महिला माथाडी प्रदेश उपाध्यक्षा सौ. अस्मिताताई कांबळे, जिल्हा सरचिटणीस ॲड. नितीन भोसले, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष नारायण नन्नवरे, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष शिवाजी बोदले, भाजपा जिल्हा उपाध्यक्ष आनंद कणले, जिल्हा सरचिटणीस साहेबराव घुगे, शिवाजीराव गिड्डे, माधवराव पवार, गणेश खरसडे, सतीश दंडनाईक, पिराजी मुंजळे, आदी मान्यवर उपस्थित होते.

### 'शेतकऱ्यांच्या मदतीसाठी कटिबद्ध'

**मुंबई :** दुष्काळग्रस्त भागांतील पंचनामे सुरू असून अहवाल प्राप्त होताच मदतीचे निकष, पीक विमा योजना आणि राज्य शासनाची मदत यांचा समन्वय साधून दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांना जास्तीत जास्त मदत देण्यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे दुष्काळासंदर्भातील मंत्रिमंडळ उपसमितीचे अध्यक्ष तथा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सांगितले.

राज्यात चारा बँका उभारून चाऱ्याची उपलब्धता वाढविण्यात येणार असून, वन विभागाच्या मोकळ्या जमिनी, तलाव परिसर आणि शासकीय जमिनींवर गवताळ क्षेत्र विकसित केले जाणार आहे. भाताची पेंढी जाळण्याऐवजी तिचा चाऱ्यासाठी उपयोग करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, ओलावा व मर्यादित पाणी उपलब्ध असलेल्या भागांत रब्बी हंगामात हरभरा व ज्वारीला प्राधान्य देण्यात येणार आहे. सीएसआरच्या माध्यमातून कंपन्यांची मदत घेणार आहे.

# ५० हजार नुकसानभरपाईसाठी मोर्चा

## उसाला ७५०० रुपये भाव द्या; शेतकरी संघटनेची निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**धाराशिव :** धाराशिव जिल्हा पूर्णपणे दुष्काळी जाहीर करून शेतकरी व शेतमजुरांच्या पाल्यांची संपूर्ण शैक्षणिक फी माफ करावी, तसेच त्यांना मोफत शालेय साहित्य देण्यात यावे, या मागणीसह विविध मागण्यांसाठी शेतकरी संघटनेच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. जिल्हाध्यक्ष चंद्रकांत भराटे यांच्या नेतृत्वाखाली ६ ऑक्टोबर रोजी हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी विविध मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आले.

जिल्ह्यातील अनेक भागांत पिके करपून वाया गेल्याचा दावा शेतकरी संघटनेने केला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट एकरी ५० हजार रुपये नुकसानभरपाई, तर शेतीवर अवलंबून असलेल्या शेतमजुरांना २५ हजार रुपये दिवाळी बोनस देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

धाराशिव जिल्हा पूर्णपणे दुष्काळी जाहीर करावा, शेतकरी व शेतमजुरांच्या पाल्यांची संपूर्ण शैक्षणिक फी माफ करून मोफत शालेय साहित्य द्यावे, अशीही मागणी करण्यात आली. पशुधन व भाकड जनावरे वाचवण्यासाठी प्रति जनावर प्रतिदिन ५०० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा करावेत, अशी मागणीही संघटनेने केली.

जिल्ह्यातील अर्धवट पाझर तलाव पूर्ण करावेत, गळती होणारे तलाव तातडीने



दुरुस्त करावेत, तसेच दुरावस्था झालेल्या कोल्हापुरी बंधाऱ्यांना दरवाजे बसवून त्यांची तातडीने दुरुस्ती करावी, अशी मागणी करण्यात आली.

याशिवाय शेतकरी विरोधी कायदे रद्द करावेत, गूळ कारखान्यांना साखर कारखान्यांप्रमाणे कायदे लागू करावेत, उसाच्या उपउत्पादनातून होणाऱ्या नफ्यातील ७० टक्के हिस्सा शेतकऱ्यांना देण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली.

२०२५-२६ मध्ये अतिवृष्टीमुळे मांजरा नदीकाठच्या पारगाव व पारा परिसरात १०० टक्के नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना एकरी ५० हजार रुपये मदत देण्यात यावी, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली. वन विभागाच्या दुर्लक्षामुळे रानडुकरांकडून पिकांचे नुकसान होत असल्याचा आरोप करत रानडुकरांचा तातडीने बंदोबस्त करण्याची मागणी करण्यात आली.

तसेच उसाला प्रति टन ७५०० रुपये भाव द्यावा, शेतकऱ्यांच्या मालाला जागतिक बाजारपेठ उपलब्ध करून द्यावी, शेतमालावरील निर्यातबंदी उठवावी आणि प्रत्येक बँकेने शेतकऱ्यांना विनाकारण विलंब न करता २ लाख रुपयांपर्यंत पीक कर्ज उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी शेतकरी संघटनेनेकडून करण्यात आली.

या मोर्चात शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष चंद्रकांत लोमटे, रामहरी लोकरे (खेर्डा), गोपाळ यादव (नागझरवाडी), चंद्रकांत स्वामी (पारा), पोपट भराटे (अमळनेर), सचिन भराटे, अंबऋषी भराटे यांच्यासह मोठ्या संख्येने शेतकरी सहभागी झाले होते.

# प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना; सर्वोत्कृष्ट १० मध्ये छत्रपती संभाजीनगर

## जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांचा १२ ऑक्टोबरला दिल्लीत सन्मान

**छत्रपती संभाजीनगर :** प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेच्या अंमलबजावणीत उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या सर्वोत्कृष्ट १० जिल्ह्यांमध्ये छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याची निवड करण्यात आली आहे. जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांचा केंद्र शासनाच्या वतीने नवी दिल्ली येथे सोमवार दि.१२ रोजी सन्मान करण्यात येणार आहे. योजनेच्या मासिक प्रगतीचे निर्धारित प्रमुख कामगिरी निर्देशकांच्या आधारे मूल्यमापन करून जिल्ह्याची या सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी यांनी दिली आहे.

कृषी उत्पादकता, पीक तीव्रता तसेच कृषी कर्ज वितरणाच्या बाबतीत तुलनेने कमी कामगिरी असलेल्या देशातील १०० जिल्ह्यांमध्ये प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजना ११ ऑक्टोबर २०२५ रोजी सुरू करण्यात आली. केंद्र शासनाच्या ११ विभागांच्या ३६




योजनांचे अभिसरण, राज्य शासनाच्या विविध योजना आणि खासगी क्षेत्राचा सहभाग यांच्या माध्यमातून ही योजना राबविण्यात येत आहे.

योजनेच्या अंमलबजावणीला एक वर्ष पूर्ण होत असल्याच्या निमित्ताने सोमवार दि.१२ रोजी सकाळी साडेअकरा वा. नवी दिल्ली येथील राष्ट्रीय कृषी विज्ञान संस्था कॉम्प्लेक्समध्ये विशेष कार्यक्रमाचे नियोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास केंद्रीय कृषिमंत्री तसेच संबंधित केंद्रीय मंत्रालये व विभागांचे मंत्री उपस्थित राहणार आहेत. या कार्यक्रमात प्रधानमंत्री धन-धान्य कृषी योजनेच्या डॅशबोर्डवर नोंदविण्यात आलेल्या मासिक प्रगतीच्या आधारे उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या जिल्ह्यांचा गौरव केला जाणार आहे. त्यासाठी महाराष्ट्रातून छत्रपती संभाजीनगर जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. यांची या सन्मानासाठी निवड करण्यात आली आहे. जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दीपक गवळी हे ही या सोहळ्यात उपस्थित असतील. तसेच गडचिरोलीच्या जिल्हाधिकाऱ्यांना उत्कृष्ट कार्यपद्धती व यशोगाथेचे सादरीकरण करण्यासाठी निमंत्रित करण्यात आले आहे. तसेच या योजनेत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या राज्यातील पालघर, यवतमाळ, गडचिरोली, धुळे, रायगड, चंद्रपूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड आणि बीड या धन-धान्य कृषी योजनेतील जिल्ह्यांमधून प्रत्येकी चार प्रतिनिधींही सहभागी होणार आहेत.

> जिल्ह्याला मिळालेल्या या बहुमानाबद्दल जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. म्हणाले की, 'हा गौरव केवळ प्रशासनाचा नसून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील कृषी विभाग आणि सर्व संबंधित कर्मचाऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचा परिणाम आहे. भविष्यातही शेतकरी कल्याणासाठी व कृषी विकासासाठी नवनवीन उपक्रम राबवून जिल्ह्याला देशात अग्रेसर ठेवण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.'

# आदर्श कॅम्पस प्रकरणाने खळबळ




## संस्थाचालक बशीर शेख विरुद्ध पोक्सो अंतर्गत गुन्हा दाखल

**लातूर :** लातूर शहरातील 'आदर्श कॅम्पस'मधील संस्थाचालक तथा प्राचार्य बशीर शेख यांच्याविरुद्ध अल्पवयीन विद्यार्थिनीशी कथित गैरवर्तन केल्याच्या आरोपावरून पोक्सो कायदा तसेच बीएनएस अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे शहरातील शैक्षणिक क्षेत्रात खळबळ उडाली आहे.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्ह्याची नोंद करण्यात आली असून, तक्रारीनुसार अल्पवयीन विद्यार्थिनीशी अश्लील स्वरूपाचे संभाषण व गैरवर्तन केल्याचा आरोप करण्यात आला आहे. प्रकरणाची गंभीरता लक्षात घेऊन पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

दरम्यान, या प्रकरणाशी संबंधित असल्याचे सांगितली जाणारी एक ऑडिओ क्लिप सोशल मीडियावर प्रसारित होत आहे. मात्र या क्लिपची सत्यता, त्यातील आवाज कोणाचा आहे तसेच संभाषणाची संपूर्ण पार्श्वभूमी याबाबत अद्याप अधिकृत निष्कर्ष समोर आलेला नाही. ऑडिओ क्लिपसह उपलब्ध पुरावे आणि संबंधित व्यक्तींचे जबाब यांची पोलिसांकडून पडताळणी केली जात आहे.

या घटनेची माहिती समोर आल्यानंतर शहरातील काही नागरिकांनी संबंधित संस्थाचालकाविरोधात सोमवार, ५ ऑक्टोबर रोजी सकाळी सुमारे ११ वाजता मोर्चा काढला. संविधान चौक येथून सुरू झालेला हा मोर्चा आदर्श शाळेपर्यंत नेण्यात आला.

या मोर्चात महिला, नागरिक, युवक, विद्यार्थिनी आणि विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतल्याचे सांगण्यात आले. सहभागी नागरिकांनी प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कायद्यानुसार कारवाई करण्याची मागणी केल्याची माहिती आहे. तसेच या प्रकरणात यापूर्वी अशा स्वरूपाच्या तक्रारी किंवा घटना घडल्या आहेत का, याचाही तपास केला जात असल्याचे सांगण्यात येते.

हे पत्रक मुद्रक नरसिंह पांडुरंग घोणे यांनी मालक, प्रकाशक, संपादक नामदेव उत्तम शिंदे यांच्याकरिता मॅजिक पब्लिकेशन, मनपा शॉपिंग कॉम्प्लेक्स नं. १०, गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर- ४१३५१२ येथे छापून गल्ली नं. ०१, मु.पो. दर्जी बोरगाव, ता. रेणापूर, जि. लातूर - ४१३५२७ येथे प्रकाशित केले. - संपादक : नामदेव उत्तम शिंदे RNI. No. MHMAR/25/A2752